SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र
वेबसाईट : www.unishivaji.ac.in
E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in
दूरध्वनी :– 2609102, 2609103
Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/503 दि. 6 MAR 2021

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख
सर्व सलंग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/अधिविभाग
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**विषयः शैक्षणिक वर्ष 2020–21 मधील ऑक्टो./नोव्हे. 2020 हिवाळी सत्रातील पदविका / पदव्युत्तर पदविका / प्रमाणपत्र अभ्यासकमांच्या परीक्षेच्या नियोजनाबाबत.**

महोदय/महोदया,

शैक्षणिक वर्ष 2020–21 मधील ऑक्टो./नोव्हे. 2020 हिवाळी सत्रातील सर्व परीक्षा दि. 22 मार्च, 2021 पासून आयोजित करण्यात येत आहेत. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार पदविका / पदव्युत्तर पदविका / प्रमाणपत्र इत्यादी सर्व अभ्यासकमाच्या सर्व सत्रांच्या परीक्षा महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर आयोजित करण्याबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

1. पदविका / पदव्युत्तर पदविका / प्रमाणपत्र इत्यादी अभ्यासकमाच्या सर्व सत्राच्या परीक्षा दि. 22 मार्च, 2021 ते दि. 22 एप्रिल, 2021 या कालावधीमध्ये महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर Online/Offline पध्दतीने आयोजित करण्यात याव्यात.
2. विद्यापीठ अधिकार मंडळाच्या निर्णयानुसार सर्व अभ्यासकमाच्या सर्व सत्राच्या परीक्षा 50 गुणांची (प्रश्नपत्रिकमध्ये एकूण 25 प्रश्न प्रत्येकी 02 गुणांचे असावेत), 1 तासाची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने घेणेत यावी.
3. सदर परीक्षेसाठी ज्या त्या अभ्यासमंडळाने निश्चित केलेल्या अभ्यासकमावर प्रश्नपत्रिका तयार करण्यात यावी. सदर अभ्यासकमासाठी अभ्यासमंडळे विभागाने विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द केलेली परिपत्रके/पत्रे अवलोकनी घ्यावीत.
4. वरील विद्यार्थ्यांच्या सर्व अभ्यासकमाच्या परीक्षेच्या प्रश्नपत्रिका संबंधीत महाविद्यालयातील/अधिविभागातील शिक्षकांनी तयार कराव्यात. तसेच सदर परीक्षा महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर आयोजित करण्यात येवून सदर परीक्षेच्या उत्तरपत्रिका तपासून प्राप्त होणा–या विद्यार्थ्यांच्या गुणांचे रूपातर (Conversion) आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाकडून करण्यात येणार असल्याने जे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त होतील तेच गुण संगणक प्रणालीमध्ये भरणेचे आहेत.
5. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य/अधिविभागप्रमुख यांचे मार्फत करणेची आहे.
6. कोव्हीड– 19 च्या प्रादुर्भावाबाबत वेळोवेळी शासन/स्थानिक प्रशासन/युजीसी यांनी दिलेल्या निर्देशांचे पालन करण्यात यावे

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रतः
1. मा. अधिविभागप्रमुख/समन्वयक, विद्यापीठातील सर्व अधिविभाग
2. मा.प्राचार्य/संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था
3. मा. संचालक, दूरशिक्षण केंद्र
4. परीक्षा विभागातील सर्व प्रशासकीय विभाग
5. समन्वयक, इंटरनेट कक्ष – संकेतस्थळावर प्रसिध्दीसाठी
6. जंनसंपर्क अधिकारी
7. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासकमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.